**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१०६/२००८</u>**
**<u>रामराव व ईतर वि. पंढरीनाथ व ईतर</u>**

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रकरण २० वर्षे जुने आहे. सन्माननीय उच्च न्यायालयाने २० वर्षे जुनी प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याचे निर्देश दिलेले आहेत. दिवाणी नियमावलीनुसार दाव्यामध्ये एकापाठोपाठ एक म्हणजेच साक्षीदारांची तुटक साक्ष नोंदवता येणार नाही. प्रतिवादीने दि.०६/०४/२०२६ रोजी साक्षीदार क्र.१ ची साक्ष पूर्ण केली. परंतु त्यांनी दि.०८/०४/२०२६, ११/०४/२०२६ आणि आजरोजी दुसऱ्या साक्षीदाराची साक्ष देण्यास कसूर केला. आजरोजी साक्षीदार गैरहजर आहे. प्रतिवादींनी तहकुबीचा अर्ज दिलेला नाही. सबब प्रकरण तहकूब करण्यासाठी पुरेसे कारण नाही. प्रतिवादींच्या कसुरामुळे त्यांची साक्ष बंद करण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.04.15 17:54:06 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – १५–०४–२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**